**Workshop on Comprehensive Transportation Study (CTS) for Mumbai Metropolitan Region and release of final report**

**An MMRDA initiative to discuss future possibilities of MMR development**

**Mumbai, 28th October, 2021**: The final report on "Comprehensive Transportation Study (CTS)-2 for Mumbai Metropolitan Region (MMR)"was released today by the august hands of Shri. Uddhav Thackeray, Hon. Chief Minister, Maharashtra in the presence of dignitaries, Shri Eknath Shinde, Hon. Minister, Urban Development Department, Maharashtra, Shri Aaditya Thackeray, Hon. Minister, Tourism and Environment, Maharashtra, Shri. S.V.R. Srinivas, IAS, Metropolitan Commissioner and other dignitaries.

The final report prepared by M/s LEA Associates South Asia Ltd. in JV with LEA International Ltd., Canada was released on the occasion of the workshop organized by Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA). This CTS -2 will guide all Municipal Corporations, Councils, CIDCO, MRVC, JNPT, MBPT, etc for the next 20 years on Infrastructure development, Institutional growth and Resource Mobilisation.

The Updation of CTS for the MMR/Transform: 2021-41 outlines the transportation strategies and guidance necessary to attain the vision under long term (2041) medium term (2031) and short term (2026) scenarios. Transform 2021-41 proposes development of integrated multi-nodal transportation system for the horizon period under 2041 by recognizing the significance of transport to support the economic growth and social well-being of MMR.

The study recommends 487 kms Metro Network, 232 kms Suburban Network, 533 kms Exclusive Bus lanes / BRTS and length of additional road network of 1264 kms (6256 lane kms) by horizon year 2041. The study further recommends 4 interstate Bus Terminal, 13 Inter-city Bus Terminals, 5 Inter-city Rail Terminals, 5 Major and 14 Minor Truck Terminals and 25 passenger water terminals by year 2041. The study has also recommended immediately needed Traffic Management measures such as junction improvements / Traffic Signals / Flyovers / Elevated roads/Robs/Rubs, Fobs/Subways/Skywalks and cycle tracks.

After the release of the Final Report by Hon. Chief Minister, Maharashtra the presentation of the CTS for MMR Updation Study was given by Shri.B. M. Setty, the Team Leader/Associate Director, LEA Associates South Asia Pvt. Ltd followed by a discussion among the stakeholders regarding the project.

The workshop began with a warm-up session with many experts in the field of transportation and development participate with the Stakeholders as they stressed on alternate transport systems in MMR to make this region more accessible and easier to commute.

The speakers during the warm up session were Dr. Sanjay Mukharjee, Vice Chairman and Managing Director, CIDCO, Shri Ravi Agrawal, CMD (Additional Charge) MRVC.

Two panel discussions were held parallely at the workshop - on the Proposed Transport Infrastructure for MMR and Institutional Changes and Resource Mobilisation.

The panel discussion on the topic of Proposed Transport Infrastructure for MMR and Institutional Changes discussed about ongoing implementation and the planned traffic and transport infrastructure in MMR and how the vision "Transforming MMR into a Sustainable Metropolis with enhanced accessibility, mobility, connectivity, safety, environment and quality of travel" can be achieved. The panel also discussed on current institutional framework and proposed institutional changes for timely implementation of planned traffic and transport infrastructure in MMR.

The panelists comprised of Dr. K. H. Govinda Raj, IAS, Additional Metropolitan Commissioner- II MMRDA, Shri. P. R. K. Murthy, Former Director (Projects)Metro, Metro- PIU, MMRDA, Prof. K. V. Krishna Rao, Head of Department, Centre for Urban Science and Engineering, IIT Bombay, Shri Mruthunjaya Devaru, Chief (a/c), T &C Division, MMRDA, Shri Sudhir Badami, Independent Civil/Structural and Transportation Professional, City Engineers/ Chief Planners from ULBs, Representatives from CIDCO, MRVC, MSRDC, MbPT, JNPT, etc.

The panel discussion on the topic of Resource Mobilisation discussed on current revenue resources and proposed sources of revenue for capital and O&M shortfalls for timely implementation of planned traffic and transport infrastructure in MMR.

The panelists were Dr. Sonia Sethi, IAS, Additional Metropolitan Commissioner-I, MMRDA, Shri R. K. Jha, Former Advisor, MMRDA, Dr. Vipin Sharma, IAS, Municipal Commissioner, Thane Municipal Corporation, Smt N. R. Masurkar, FA (I/c), MMRDA, Shri Siddharth Gondhale, Additional Chief (a/c) Transport and Communication Division, MMRDA, City Engineers/ Chief Planners from ULBs, Dr. Niranjan Hiranandani, Founder and MD Hiranandani Group, Representatives from CIDCO, MRVC, MSRDC, MbPT, JNPT etc.,

While summing up the panel discussion Dr. K. H. Govinda Raj, IAS, Additional Metropolitan Commissioner- II, MMRDA presented the talk on Proposed Transport infrastructure for MMR and Institutional Changes and Dr. Sonia Sethi, IAS, Additional Metropolitan Commissioner- I, MMRDA presented the talk on Resource mobilization.

Shri Bhushan Gagrani, IAS, Principal Secretary (1), Urban Development Department, Government of Maharashtra was the Guest of Honour at the workshop.

The workshop culminated with Shri S.V.R. Srinivas, IAS, Metropolitan Commissioner presenting an Action Plan to make MMR Region “Future Ready”.

**Quotes by Dignitaries present at the event:**

While releasing the report, Shri. Uddhav Thackeray, Hon. Chief Minister, Maharashtra said “Government and administration have one single duty to serve the people and give them facilities. Planning is a continuous process. Transport system is the blood stream of our city and our needs are increasing and planning is a must to follow these needs. Today, the percentage of people travelling through public transport has reduced as seen by the numbers. One reason could be of Covid-19 related lockdown. But it will increase only when we give a clean and neat public transport system for the people. However, we should not kill environment while going for development. I assure that the Government will support team MMRDA in all they do for the development of MMR region.”

Shri Eknath Shinde, Hon. Minister, Urban Development, Maharashtra, said “Today the MMRDA transportation study report has been released by the hands of Uddhav Thackeray, Hon. Chief Minister of Maharashtra. Every year MMR experiences changes in our region's dynamics, increase in the population growth. The CTS-2 highlights how the transport system for the next 20 years will evolve. I congratulate and thank Shri. S.V.R. Srinivas, IAS, Metropolitan Commissioner for this project. People are expecting a lot from MMRDA as they complete the project in time bound manner.”

Shri S. V. R. Srinivas, IAS, Metropolitan Commissioner while presenting the ‘Overview on CTS-2 for MMR Updation study’ said, “The Updation of CTS for the MMR articulates a vision of the MMR’s future transportation scenario -Transforming MMR into a Sustainable Metropolis with enhanced accessibility, mobility, connectivity, safety, environment and quality of travel. The future transportation envisages a seamless, integrated system that would facilitate commuters to travel across the region without major inconvenience using various modes of transport. The use of Public transit has been emphasized to enhance mobility, accessibility and reduction of the carbon footprint”

मुंबई महानगर प्रदेशासाठी सर्वंकष वाहतूक अभ्यास (सी. टी. एस.) विषयावरील कार्यशाळा आणि अंतिम अहवालाचे विमोचन

मुंबई महानगर प्रदेशाच्या विकासाबाबत भविष्यातील संधींची चर्चा करण्यासाठी एम. एम. आर. डी. ए. चा उपक्रम

मुंबई, २८ ऑक्टोबर २०२१:मुंबई महानगर प्रदेशासाठी (एम.एम.आर.) सर्वंकष वाहतूक अभ्यास (सी.टी.एस.)-२चे विमोचन श्री. उद्धव ठाकरे, माननीय मुख्यमंत्री, **महाराष्ट्रराज्य**, यांच्या हस्ते **श्री. एकनाथ शिंदे**, **मा. नगरविकास**, **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) आणि अध्यक्ष एम.एम.आर.डी.ए.**, **श्री. आदित्य ठाकरे (पर्यावरण आणि पर्यटन मंत्री व मुंबई उपनगरचे पालक मंत्री)**, श्री. एस.व्ही.आर. श्रीनिवास, भा.प्र.से., महानगर आयुक्त आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले.

मे. ली असोसिएट्स साऊथ एशिया लिमिटेड यांनी ली इंटरनॅशनल, कॅनडा यांच्या संयुक्त विद्यमाने तयार केलेल्या अंतिम अहवालाचे विमोचन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण **(एम. एम. आर. डी. ए.)** यांनी आयोजित केलेल्या कार्यशाळेच्या निमित्ताने करण्यात आले. या सी.टी.एस.-२ मधून महानगरपालिका, नगरपालिका, सिडको, एमआरव्हीसी, जेएनपीटी, एमबीपीटी इत्यादींना पुढील २० वर्षांसाठी पायाभूत सुविधा विकास, संस्थात्मक वाढ आणि स्त्रोतांचे व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन मिळेल.

एम.एम.आर./ट्रान्सफॉर्मः२०२१-४१ साठी सी.टी.एस.च्या अद्ययावतीकरणात ध्येय साध्य करण्यासाठी दीर्घकालीन (२०४१), मध्यकालीन (२०३१) आणि लघुकालीन (२०२६) कालावधीत वाहतुकीची धोरणे आणि मार्गदर्शन अधोरेखित केलेले आहे. ट्रान्सफॉर्म २०२१-४१मध्ये २०४१ अंतर्गत होरायझन कालावधीसाठी एकात्मिक बहुमाध्यम वाहतूक यंत्रणेचा विकास प्रस्तावित केलेला आहे आणि त्यासाठी एम.एम.आर.ची आर्थिक वाढ आणि सामाजिक आरोग्य उत्तम राखण्यासाठी वाहतुकीचे महत्त्व समजून घेतले गेले आहे.

सदर अभ्यासात होरायझन वर्ष २०४१ पर्यंत ४८७ किमी मेट्रो नेटवर्क, २३२ किमी विशेष बसमार्गिका/ बीआरटीएस आणि १२६४ किमीची अतिरिक्त रस्ते साखळी (६२५६ मार्गिका किलोमीटर) प्रस्तावित केले

आहे. या अभ्यासात ४ आंतरराज्य बसस्थानके, १३ आंतरशहर बस स्थानके, ५ आंतरशहर रेल्वे टर्मिनल, ५ मोठी आणि १४ लहान ट्रक टर्मिनल आणि २५ प्रवाशी जल वाहतूक टर्मिनल्स २०४१ पर्यंत प्रस्तावित केलेली आहे. या अभ्यासात चौकातील दुरूस्ती/ वाहतूक सिग्नल/ उड्डाणपूल/उन्नत रस्ते/ आरओबी/ आरयूबी/ एफओबी/ भुयारी पादचारी मार्ग/ स्कायवॉक आणि सायकल मार्गिका अशा तातडीच्या वाहतूक व्यवस्थापन उपाययोजनांचीही शिफारस केलेली आहे.

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र यांच्या हस्ते अंतिम अहवालाच्या प्रकाशनानंतर एम.एम.आर. अद्ययावतीकरण अभ्यासासाठी सी.टी.एस.चे सादरीकरण श्री. बी. एम. शेट्टी, टीमप्रमुख/ असोसिएट संचालक, ली असोसिएट्स साऊथ एशिया प्रा. लि. यांनी केले आणि त्यानंतर विविध भागधारकांनी या प्रकल्पाबाबत चर्चा केली.

कार्यशाळेची सुरूवात वाहतूक आणि विकासाच्या क्षेत्रातील अनेक तज्ञांसोबत चर्चासत्राने झाली. त्यांनी एम.एम.आर. प्रदेशाला अधिक सहजसाध्य आणि प्रवासासाठी सुलभ बनवण्याच्या दृष्टीने पर्यायी वाहतूक यंत्रणांवर भर दिला.

या चर्चासत्रातील वक्त्यांमध्ये डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, सिडको, श्री. रवी अग्रवाल, सीएमडी (अतिरिक्त प्रभार) एमआरव्हीसी यांचा समावेश होता.

कार्यशाळेत एकाच वेळी दोन चर्चासत्रांचे आयोजन **एम.एम.आर.साठी प्रस्तावित वाहतूक पायाभूत सुविधा आणि संस्थात्मक बदल आणि स्त्रोतांचे एकत्रीकरण**या विषयांवर करण्यात आले होते.

**एम.एम.आर.साठी प्रस्तावित वाहतूक पायाभूत सुविधा**या विषयावरील चर्चासत्रात एम.एम.आर.मधील सुरू असलेली अंमलबजावणी आणि नियोजित प्रवास आणि वाहतूक पायाभूत सुविधा यांच्यावर तसेच "एम.एम.आर. प्रदेशाचे वाढीव पोहोच, प्रवास, जोडणी, सुरक्षितता, वातावरण आणि प्रवासाचा दर्जा यांच्या माध्यमातून शाश्वत महानगरात रूपांतर कशा प्रकारे करता येईल" या मुद्द्यावर चर्चा झाली. या सत्रातील वक्त्यांनी सध्याचा संस्थात्मक आराखडा आणि नियोजित वाहतूक आणि प्रवास पायाभूत सुविधा एम.एम.आर. प्रदेशात देण्यासाठी संस्थात्मक बदल प्रस्तावित केले.

या चर्चासत्रात सहभागी झालेल्या वक्त्यांमध्ये डॉ. के. एच. गोविंदा राज, भा.प्र.से., अतिरिक्त महानगर आयुक्त- ॥, एम.एम.आर.डी.ए., श्री. पी. आर. के. मूर्ती, माजी संचालक (प्रकल्प) मेट्रो, मेट्रो- पीआययू, एम.एम.आर.डी.ए., प्रा. के. व्ही. कृष्णा राव, विभागप्रमुख, सेंटर फॉर अर्बन सायन्स अँड इंजिनीअरिंग, आयआयटी मुंबई, श्री. मृत्यूंजर देवरू प्रमुख (लेखा), टी आणि सी विभाग, एम.एम.आर.डी.ए., श्री. सुधीर बदामी, स्वतंत्र स्थापत्य / संचरनात्मक आणि वाहतूक व्यावसायिक, शहर अभियंते/ प्रमुख नियोजक स्थानिक स्वराज्य संस्था, सिडको, एमआरव्हीसी, एमएसआरडीसी, एमबीपीटी, जेएनपीटी इत्यादींच्या प्रतिनिधींचा समावेश होता.

स्रोतांचे एकत्रीकरण या विषयावरील चर्चासत्रात सध्याचे महसूली स्रोत आणि एम.एम.आर.मधील नियोजित वाहतूक आणि प्रवास पायाभूत सुविधांच्या वेळेत अंमलबजावणीसाठी भांडवली आणि कार्यान्वयन आणि देखभाल खर्चाच्या प्रस्तावित महसुली स्रोतांबाबत चर्चा झाली.

यातील वक्ते होते- डॉ. सोनिया सेठी, भा.प्र.से, अतिरिक्त महानगर आयुक्त-।, एम.एम.आर.डी.ए., श्री. आर. के झा, माजी सल्लागार, एम.एम.आर.डी.ए., डॉ. विपिन शर्मा, भा.प्र.से, महापालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका, श्रीमती एन. आर. मसूरकर, एफ.ए (लेखा),एम.एम.आर.डी.ए., श्री. सिद्धार्थ गोंधळे, अतिरिक्त प्रमुख लेखा अधिकारी, वाहतूक आणि जनसंपर्क विभाग, एम.एम.आर.डी.ए., शहर अभियंते / प्रमुख नियोजक स्थानिक स्वराज्य संस्था, डॉ. निरंजन हिरानंदानी, संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक, हिरानंदानी ग्रुप, सिडको, एमआरव्हीसी, एमएसआरडीसी, एमबीपीटी, जेएनपीटी इत्यादींचे प्रतिनिधी.

चर्चासत्रांचा समारोप करताना डॉ. के. एच. गोविंदा राज, भा.प्र.से., अतिरिक्त महानगर आयुक्त- ॥,एम.एम.आर.डी.ए., यांनी एम.एम.आर.साठी प्रस्तावित वाहतूक पायाभूत सुविधा आणि संस्थात्मक बदलांबाबत मते मांडली आणि डॉ. सोनिया सेठी, भा.प्र.से, अतिरिक्त महानगर आयुक्त-।, एम.एम.आर.डी.ए., यांनी स्रोतांच्या एकत्रीकरणा बाबत मत मांडले.

श्री. भूषण गगराणी, भा.प्र.से, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन हे या कार्यशाळेत सन्माननीय अतिथी होते.

या कार्यशाळेचा समारोप श्री. एस.व्ही.आर., श्रीनिवास, भा.प्र.से, महानगर आयुक्त यांनी एम.एम.आर. प्रदेशाला "फ्युचर रेडी" बनवण्यासाठी कृती आराखडा सादर करून केला.

**कार्यक्रमात उपस्थित असलेल्या मान्यवरांची मते:**

**अहवालाचे प्रकाशन करताना श्री. उद्धव ठाकरे, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य** म्हणाले की, "शासन आणि प्रशासन यांचे जनतेची सेवा करणे आणि त्यांना सुविधा पुरवणे हे प्रमुख कर्तव्य असते. नियोजन ही सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे. वाहतूक यंत्रणा ही आपल्या शहराची रक्तवाहिनी आहे आणि आपल्या गरजा बदलत असून या गरजा पूर्ण करण्यासाठी नियोजन अत्यावश्यक आहे. आज सार्वजनिक वाहतुकीने प्रवास करणाऱ्यांचा टक्का कमी झाला आहे हे आकडेवारीवरून दिसते. परंतु आपण स्वच्छ आणि नीटनेटकी सार्वजनिक वाहतूक यंत्रणा जनतेला देऊ तेव्हाच हा टक्का वाढेल. तथापि, आपण विकास करताना पर्यावरणाचा नाश होऊ देऊ नये. मी खात्री देतो की सरकार एम.एम.आर.डी.ए.ला एम.एम.आर. प्रदेशाच्या विकासासाठी पूर्ण सहकार्य करेल."

**श्री. एकनाथ शिंदे**, **मा. नगरविकास**, **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) आणि अध्यक्ष एम**.**एम**.**आर**.**डी**.**ए.,**म्हणाले की, "आज एम.एम.आर.डी.ए. वाहतूक अहवालाचे प्रकाशन श्री. उद्धव ठाकरे, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते पार पडले. दर वर्षी एम.एम.आर. मध्ये बरेचसे बदल झालेले दिसतात, लोकसंख्येत वाढ झालेली दिसते. सी.टी.एस.-२ मधून पुढील २० वर्षांत वाहतूक यंत्रणा कशा प्रकारे बदलेल हे अधोरेखित केलेले आहे. मी श्री. एस.व्ही.आर. श्रीनिवास, भा.प्र.से., महानगर आयुक्त यांचे या प्रकल्पासाठी अभिनंदन करतो आणि आभार मानतो. लोक एम.एम.आर.डी.ए.कडून खूप अपेक्षा ठेवून आहेत कारण ते प्रकल्प कालबद्ध पद्धतीने पूर्ण करतात."

**श्री. एस.व्ही.आर. श्रीनिवास, भा.प्र.से., महानगर आयुक्त** यांनी एम.एम.आर. अद्ययावतीकरण अभ्यासासाठी सी.टी.एस.-२बाबत थोडक्यात माहिती देताना सांगितले की, एम.एम.आर.साठी सी.टी.एस. हा एम.एम.आर.च्या भविष्यातील वाहतुकीवर दृष्टीक्षेप टाकतो. एम.एम.आर.ला वाढीव पोहोच, प्रवास, जोडणी, पर्यावरण आणि प्रवासाचा दर्जा यांद्वारे एक शाश्वत महानगरात रूपांतरित करण्याबाबत माहिती देतो. भविष्यातील वाहतूक एक सुलभ आणि एकात्मिक यंत्रणा असेल जी प्रवाशांना संपूर्ण प्रदेशात फारशी गैरसोय न होता आणि प्रवासाची विविध माध्यमे वापरून प्रवास करण्याची संधी देईल.**आम्ही आशा करतो मुंबई महानगर क्षेत्रातील महापालिकांनी सर्वंकष वाहतूक आराखड्याचे अवलोकन करून नियोजन आराखडे बनवावेत व प्रत्येक महापालिकेत स्वतंत्र वाहतूक नियोजन विभाग स्थापन करणे**. सार्वजनिक वाहतुकीच्या वापरातून प्रवास, साध्यता वाढवणे आणि कार्बन ऊत्सर्जन कमी करणे हे आमचे ध्येय आहे.”

